# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०५/२०२२** **दिनांक २१.०५.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शनिवार दि.२१.०५.२०२२ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/६२४/२०२२, दि.१३.०५.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शनिवार दि.२१.०५.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.ना.श्री.आशुतोष अशोकराव काळे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

**१. मा.ना.श्री. आशुतोष अशोकराव काळे. अध्यक्ष**
**२. मा.ॲड. जगदीश हरिश्चंद्र सावंत, उपाध्यक्ष**
**३. मा.श्रीमती अनुराधा गोविंदराव आदिक, सदस्य**
**४. मा.ॲड. सुहास जनार्दन आहेर, सदस्य**
**५. मा.श्री. अविनाश अप्पासाहेब दंडवते, सदस्य**
**६. मा.श्री. सचिन रंगराव गुजर, सदस्य**
**७. मा.श्री. रराहुल नारायण कनाल, सदस्य**
**८. मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, सदस्य**
**९. मा.श्री. जयवंतराव पुंडलिकराव जाधव, सदस्य**
**१०. मा.श्री. महेंद्र गणपतराव शेळके, सदस्य**
**११. मा.डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, सदस्य**

**मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

समिती सदस्य मा.श्री. रराहुल नारायण कनाल हे सभेस ऑनलाईन उपस्थित होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.१२.२०२१ रोजी झालेल्या सभेतील निर्णयावर संबधीत विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

---

**विषय नं.०१** **दि.२७.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२८२** **दिनांक २७.०४.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.** **(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०२** **श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक या विभागाकरीता Electric Drill Machine without Battery (With 1 Year Warranty + Next 5 Year LAMC) सह ई-निविदा मागवून खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रु.१५,५३,७०९/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक या विभागामध्ये सध्या कार्यरत असलेल्या तीनही Electric Drill Machine चा एक वर्ष वॉरंटी कालावधी संपलेला असुन WHO चे Guideline नुसार सदर मशिनचे Life संपलेले आहे. क्वचित प्रसंगी मशिन नादुरुस्त होत आहे. तसेच आर्थोपेडीक विभागातील वाढती रुग्ण संख्या या बाबी विचारात घेऊन श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक विभागाकरीता तीन नग Electric Drill Machine With 1 Year Warranty Next+5 Year LAMC सह खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१५,५३,७०९/-मात्रचे खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.०३ श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञांची व्हिजीटींग पध्दतीने ऑनकॉल सेवा घेणेबाबत.

निर्णय क्र.२८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील कनिष्ठ भुलतज्ञ म्हणून तात्पुरत्या स्वरुपात ऑन कॉल बेसीस पध्दतीने सेवा घेणेबाबत तयार करण्यात आलेल्या पॅनलमधील डॉ.बन्सी ढाकणे यांनी दि.१०.०२.२०२२ रोजीचे अर्जान्वये स्वेच्छेने व्हिजीटींग भुलतज्ञ पदाचा राजीनामा दिलेला असून डॉ.यशोधन अरुण पितांबरे व डॉ.अशोक मेघराज गरुटे हेही रुग्णसेवा देत नसल्याने त्यांची सेवा बंद करुन डॉ.विजयकुमार दादाराव कर्डीले यांची मेजर/तातडीचे शस्त्रक्रियेकरीता रु.२०००/- व मेडीयम/मायनर शस्त्रक्रियेकरीता रु.१५००/- या दरानुसार दि.०१.०५.२०२२ ते दि.३०.०४.२०२३ अखेर ऑनकॉल बेसीस पध्दतीने सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६२,२९,४९५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०२२ महिन्यात वैद्यकीय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहीत पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु. ६२,२९,४९५/-मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०५ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.५,३०,६७२/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.२८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावामधील नमुद १३ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.५,३०,६७२/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०६ संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रींकिंग वॉटर खरेदीकामी ई-निविदा प्राप्त निम्नतम दराबाबत निर्णय होऊन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.२८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रींकिंग वॉटर खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक **SEASON CHOICE HYMART** यांचे **Packaged Drinking Water 1 Litre Bottle (I.S.I)** करीता रक्कम रु.५.९८ व **Packaged Drinking Water 500 Ml. Bottle (I.S.I)** करीता रक्कम रु.४.४० हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निविदाधारक श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स व साई ॲग्रो इंडस्ट्रीज यांचे दर समान असल्याने या दोनही निविदाधारकांनी एकमेकांशी समन्वय साधुन दर दिले असल्याची शंका मा.अध्यक्ष महोदय यांनी व्यक्त केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, मा.अध्यक्ष महोदय यांनी व्यक्त केलेली शंका रास्त वाटत असुन याबाबत चौकशीस वाव आहे. म्हणून सध्या आवश्यक तेवढा पुरवठा आदेश देऊन याबाबत चौकशी करण्यात येईल.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.०७ संस्थानचे प्रसादालय, लाडु निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.२८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रसादालय, लाडु निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील खालील प्रमाणे निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

**M/s .Hariom Flexipack Industries, Kolhapur**

| Tender Sr.No | Description of Work / Item(s) | No. of Qty | Units | L1 Rate in Tender |
|---|---|---|---|---|
| 1 | Size 4.5"x6.5" (भाजी) | 130 | Quintal | 16,400.00 |
| 6 | Size 8" x 10" (प्लेन) | 3 | Quintal | 16,400.00 |

**M/s. Star Packaging, Daman**

| Tender Sr.No | Description of Work / Item(s) | No. of Qty | Units | L1 Rate ni Tender |
|---|---|---|---|---|
| 2 | Size 6"x 7" लाडू | 600 | Quintal | 18,000.00 |
| 3 | Size 5"x 6" बुंदी | 400 | Quintal | 16,900.00 |
| 5 | Size 8"x 10" साई सत्यव्रत | 10 | Quintal | 16,500.00 |

**M/s .Jayant Printery LLP, Mumbai**

| Tender Sr.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | L1 Rate in Tender |
|---|---|---|---|---|
| 4 | Size 8" x 10" नाष्टा पॅकेट | 350 | Quintal | 16,800.00 |

वरील नमुद पेपर पिशव्यांपैकी अ.नं.१– 4.5x6.5 व अनं.६- 8x10 प्लेन पिशव्यांसाठी मे.हरीओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांना व अ.नं.-४- 8x10 नाष्टा पॅकेट पिशवीसाठी मे.जयंत प्रिंटरी एलएलपी, मुंबई यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता देण्यात आली. तसेच मागील वर्षी मे.हरीओम प्लेक्झिपॅक इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांनी नाष्टा पॅकेट पेपर पिशव्यांचा शेवटी संस्थानला पुरवठा केलेला नाही. त्यामुळे त्यांना 6x7 व 5x6 या पिशव्यांसाठी ५० टक्के परिमाणाचा पुरवठा आदेश न देणेबाबत व मे.स्टार पॅकेजींग, दमण यांनी 6x7 पेपर पिशव्यांच्या पुरवठयाच्या बाबतीत पेपर उपलब्ध करुन संस्थानला पुरवठयाबाबत सहकार्य केले आहे. म्हणून ई-निविदेत न्युनतम असलेल्या अ.नं.२ 6x7 लाडू प्रसाद, अ.नं.३ 5x6 बुंदी प्रसाद व अ.नं.५ 8x10 श्री साई सत्यव्रत प्रसाद पेपर पिशव्यांसाठी पुर्ण परिमाणाचा पुरवठा आदेश मे.स्टार पॅकेजींग, दमण यांना देण्यात यावा.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.०८ प्रसादालय विभागासाठी सन २०२०-२१ (जानेवारी-२०२२ ते सप्टेंबर-२०२२) किराणामाल व वनस्पती तुप खरेदीकामी फेर ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.२८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय विभागासाठी सन २०२०-२१ (जानेवारी-२०२२ ते सप्टेंबर-२०२२) किराणामाल व वनस्पती तुप खरेदीकामी राबविणेत आलेल्या फेर ई-निविदा प्रक्रियेतील खालील प्रमाणे निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

**R.S.Bajaj Tea Company, Jaipur**

| Sr.No | Description | Quantity | Unit | L1 Rate in Tender Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Dry Coconut wati (Khobarevati) Rajapuri, Kalipath, Dry | 200 | Quintal | 20,500.00 |

**Shree Traders, Sangamner**

| Sr.No | Description | Quantity | Unit | L1 Rate in Tender Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Amsul- Olsar, Best Quality | 24 | Quintal | 6,000.00 |
| 2 | Tamarind (Chinch) - Fodleli & Clean (बिगर चिंचोकेची) | 19 | Quintal | 10,000.00 |
| 3 | White Sesame (Safed Til) Best Quality | 1 | Quintal | 13,500.00 |
| 4 | Udid Papad- Best Quality | 100 | Quintal | 19,000.00 |

**Jaihind Kirana Stores, Nashik**

| Sr.No | Description | Quantity | Unit | L1 Rate in Tender Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Asafoetida (Hing Khada) Agmark/ FSSAI | 1 | Quintal | 26,300.00 |
| 2 | Asafoetida Powder (Hing Powder) Agmark/ FSSAI | 9.5 | Quintal | 31,800.00 |

**तसेच**

अ.नं.४ भाजके पोहे, व अ.नं.११ सुतळी करीता एकच निविदा प्राप्त झालेली आहे. तसेच अ.नं.८ मगज बी करीता एकच नमुद निवडला गेला आहे. तथापी या तीनही वस्तुंच्या खरेदी किंमती या १० लाखांचे आत असलेमुळे सदर आयटेमसाठी दरपत्रके मागवुन खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

अ.नं.९ वनस्पती तूपासाठी एकच नमुना निवडला गेला असल्याने याकामी सप्टेंबर २०२२ पर्यंतचे कालावधीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.

सुधारीत खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ (२) तरतुदीनुसार वरील किंमत श्रेणीमध्ये अ.नं.१ खोबरेवाटी, ३-चिंच व ६- हिंग पावडर हे ३ आयटेम बसत असल्याने त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

अ.नं.२- आमसुल, ५- सफेद तीळ, ६- खडा हिंग, १०- उडिद पापड या ४ आयटेमसाठी Estimated Cost पेक्षा कमी किंमत प्राप्त झाली आहे. त्यामुळे या आयटेमसाठी फेर ई-निविदा करण्याची तरतुद आहे. तथापि सदर आयटेम खरेदीचा कालावधी फक्त ४ महिन्यांचा बाकी आहे. तसेच या ४ महिन्यात खरेदीचे प्रमाणही कमी राहणार आहे. कमी आयटेमसाठी निविदेला फारसा प्रतिसाद मिळत नाही. याबाबी विचारात घेता याकामी पुन्हा ई-निविदा प्रक्रिया न करता ते विशेष बाब म्हणून खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

अ.नं.१ खोबरेवाटीसाठी मे.आर.एस.बजाज टी कंपनी, जयपुर यांचे दर न्युनतम आहेत. तथापि मे.आर.एस.बजाज टी कंपनी, जयपुर हे महाराष्ट्र राज्याबाहेरील असल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.३.१.२.८ नुसार सदर आयटेमसाठी महाराष्ट्रातील व्दितीय न्यूनतम दरधारक मे.श्री ट्रेडर्स, संगमनेर हे, प्रथम न्यूनतम दरधारक मे.आर.एस.बजाज टी कंपनी, जयपुर यांचे न्यूनतम दरात मे.श्री ट्रेडर्स, संगमनेर हे सदर आयटेम्सचा पुरवठा करणेस तयार असल्यास एकूण परिमाणाच्या म्हणजेच ५० टक्के परिमाणाचा पुरवठा आदेश मे.श्री ट्रेडर्स, संगमनेर यांना देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.०९ सन २०२२-२३ करीता भाजीपाला खरेदीबाबत.

निर्णय क्र.२९० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रसादालय विभागासाठी सन २०२२-२३ या वर्षाकरीता लागणारा भाजीपाला तीन महिन्याचे कालावधीत चार टप्प्यामध्ये खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील खालील प्रमाणे निम्नतम निविदाधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

१. मे.जय मल्हार ट्रेडींग कंपनी, राहाता.

| एप्रिल-२०२२ ते जुन-२०२२ | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sl.No** | **Description of Item(s)** | **No.of Qty** | **Units** | **L1 Rate in Tender** |
| 1 | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | 75000.00 | किलो | 19.99 |
| 2 | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | 50000.00 | किलो | 14.99 |
| 3 | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | 7500.00 | किलो | 39.99 |
| 4 | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | 2000.00 | किलो | 50.00 |
| 5 | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | 1375.00 | किलो | 10.00 |
| 6 | लिंबु -चांगल्या प्रतिचे | 75.00 | किलो | 75.50 |
| 7 | आद्रक -चांगल्या प्रतिचा, गावरान | 1000.00 | किलो | 24.99 |
| 8 | गाजर -चांगल्या प्रतिचा , गावरान | 250.00 | किलो | 30.00 |
| 9 | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | 200.00 | किलो | 51.00 |
| 10 | मेथी भाजी-चांगल्या प्रतिची, गावरान | 150.00 | किलो | 30.11 |
| 11 | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | 175.00 | किलो | 30.11 |
| 12 | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | 75.00 | किलो | 36.99 |
| 13 | बीट -चांगल्या प्रतिचा | 6.00 | किलो | 20.00 |
| 14 | तोंडले - चांगल्या प्रतिचे | 12.00 | किलो | 45.00 |
| 15 | हिरवा वाटाणा | 2000.00 | किलो | 75.00 |
| जुलै - २०२२ ते सप्टेंबर २०२२ | | | | |
| **Sl.No** | **Description of Item(s)** | **No.of Qty** | **Units** | **L1 Rate in Tender** |
| 1 | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | 75000.00 | किलो | 21.99 |
| 2 | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | 50000.00 | किलो | 17.50 |
| 3 | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | 2000.00 | किलो | 40.40 |
| 4 | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | 1375.00 | किलो | 10.00 |
| 5 | लिंबु -चांगल्या प्रतिचे | 75.00 | किलो | 75.00 |
| 6 | आद्रक -चांगल्या प्रतिचा, गावरान | 1000.00 | किलो | 28.99 |
| 7 | गाजर -चांगल्या प्रतिचा , गावरान | 250.00 | किलो | 31.00 |
| 8 | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | 150.00 | किलो | 31.00 |
| 9 | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | 125.00 | किलो | 75.00 |
| 10 | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | 100.00 | किलो | 25.00 |
| 11 | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | 175.00 | किलो | 45.00 |
| 12 | रताळे -चांगल्या प्रतिचे , गावरान | 100.00 | किलो | 35.00 |
| 13 | बीट -चांगल्या प्रतिचा | 6.00 | किलो | 30.00 |
| 14 | तोंडले - चांगल्या प्रतिचे | 12.00 | किलो | 20.00 |
| 15 | हिरवा वाटाणा | 1500.00 | किलो | 60.00 |

| ऑक्टोबर - २०२२ ते डिसेंबर २०२२ | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sl.No** | **Description of Item(s)** | **No.of Qty** | **Units** | **L1 Rate in Tender** |
| 1 | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | 75000.00 | किलो | 22.99 |
| 2 | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | 50000.00 | किलो | 24.51 |
| 3 | लसुण-चांगल्या प्रतिचा,मोठा वाळलेला, गावरान | 7500.00 | किलो | 54.99 |
| 4 | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | 2000.00 | किलो | 45.00 |
| 5 | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | 1375.00 | किलो | 40.00 |
| 6 | लिंबु -चांगल्या प्रतिचे | 75.00 | किलो | 75.00 |
| 7 | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | 10000.00 | किलो | 34.40 |
| 8 | आद्रक -चांगल्या प्रतिचा, गावरान | 1000.00 | किलो | 35.90 |
| 9 | गाजर -चांगल्या प्रतिचा , गावरान | 250.00 | किलो | 30.99 |
| 10 | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | 2000.00 | किलो | 30.99 |
| 11 | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | 600.00 | किलो | 45.00 |
| 12 | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | 175.00 | किलो | 45.00 |
| 12 | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | 300.00 | किलो | 60.00 |
| 14 | रताळे -चांगल्या प्रतिचे , गावरान | 100.00 | किलो | 45.00 |
| 15 | बीट -चांगल्या प्रतिचा | 6.00 | किलो | 20.00 |
| 16 | फ्लावर -चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 45.99 |
| 17 | तोंडले - चांगल्या प्रतिचे | 13.00 | किलो | 20.99 |
| जानेवारी- २०२३ ते मार्च २०२३ | | | | |
| 1 | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | 75000.00 | किलो | 16.40 |
| 2 | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | 50000.00 | किलो | 15.15 |
| 3 | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | 7500.00 | किलो | 48.50 |
| 4 | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | 2000.00 | किलो | 40.00 |
| 5 | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | 20000.00 | किलो | 19.99 |
| 6 | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | 1375.00 | किलो | 10.00 |
| 7 | लिंबु -चांगल्या प्रतिचे | 75.00 | किलो | 75.00 |
| 8 | गाजर -चांगल्या प्रतिचा , गावरान | 250.00 | किलो | 25.99 |
| 9 | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | 150.00 | किलो | 25.99 |
| 10 | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | 125.00 | किलो | 60.00 |
| 11 | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | 150.00 | किलो | 35.00 |
| 12 | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | 175.00 | किलो | 35.00 |
| 13 | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | 50.00 | किलो | 60.00 |
| 14 | बीट -चांगल्या प्रतिचा | 7.00 | किलो | 20.00 |
| 15 | तोंडले - चांगल्या प्रतिचे | 13.00 | किलो | 20.00 |
| 16 | हिरवा वाटाणा | 3500.00 | किलो | 60.00 |

**२. Salunke Trading Company, Pune**

| एप्रिल - २०२२ ते जुन २०२२ | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sl.No** | **Description of Item(s)** | **No.of Qty** | **Units** | **L1 Rate in Tender Rs** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | 20000.00 | किलो | 18.00 |
| जुलै - २०२२ ते सप्टेंबर २०२२ | | | | |
| Sl.No | Description of Item(s) | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | 7500.00 | किलो | 50.00 |
| 2 | पालक - चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 24.00 |
| ऑक्टोबर - २०२२ ते डिसेंबर २०२२ | | | | |
| Sl.No | Description of Item(s) | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | टोमॅटो-चांगल्या प्रतिचा, मोठा | 11250.00 | किलो | 30.00 |
| 2 | पालक - चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 18.00 |
| जानेवारी- २०२३ ते मार्च २०२३ | | | | |
| Sl.No | Description of Item(s) | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | 8750.00 | किलो | 52.00 |
| 2 | फ्लावर -चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 35.00 |

**Jai Yogeshwar and Company, Rahata**

| Sl.No | Description of Item(s) | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
|---|---|---|---|---|
| एप्रिल - २०२२ ते जुन २०२२ | | | | |
| 1 | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | 8750.00 | किलो | 47.00 |
| 2 | वांगी -चांगल्या प्रतिचा, गावरान | 21250.00 | किलो | 24.40 |
| 3 | टोमॅटो - चांगल्या प्रतिचा, मोठा | 11250.00 | किलो | 23.74 |
| 4 | कोबी - चांगल्या प्रतिचा | 30000.00 | किलो | 12.50 |
| 5 | भोपळा - चांगल्या प्रतिचा | 42500.00 | किलो | 13.74 |
| 6 | पालक - चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 19.00 |
| 7 | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | 10000.00 | किलो | 29.48 |
| 8 | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | 125.00 | किलो | 50.00 |
| 9 | फ्लावर -चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 39.00 |
| 10 | दोडके - चांगल्या प्रतीचे | 2500.00 | किलो | 39.40 |
| जुलै - २०२२ ते सप्टेंबर २०२२ | | | | |
| Sl.No | Description of Item(s) | No.of Qty | Units | L1 Rate in Tender |
| 1 | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | 8750.00 | किलो | 49.00 |
| 2 | वांगी -चांगल्या प्रतिचा, गावरान | 21250.00 | किलो | 33.00 |
| 3 | टोमॅटो - चांगल्या प्रतिचा, मोठा | 11250.00 | किलो | 24.50 |
| 4 | कोबी - चांगल्या प्रतिचा | 30000.00 | किलो | 17.25 |
| 5 | भोपळा - चांगल्या प्रतिचा | 42500.00 | किलो | 17.00 |
| 6 | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | 20000.00 | किलो | 13.00 |
| 7 | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | 10000.00 | किलो | 29.74 |
| 8 | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | 75.00 | किलो | 44.00 |
| 9 | फ्लावर -चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 39.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | दोडके - चांगल्या प्रतीचे | 2500.00 | किलो | 39.00 |
| ऑक्टोबर - २०२२ ते डिसेंबर २०२२ | | | | |
| 1 | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | 8750.00 | किलो | 43.00 |
| 2 | वांगी -चांगल्या प्रतिचा, गावरान | 21250.00 | किलो | 29.50 |
| 3 | कोबी - चांगल्या प्रतिचा | 30000.00 | किलो | 15.50 |
| 4 | भोपळा - चांगल्या प्रतिचा | 42500.00 | किलो | 19.40 |
| 5 | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | 20000.00 | किलो | 13.40 |
| 6 | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | 125.00 | किलो | 70.00 |
| 7 | गवार शेंगा - गावरान | 50.00 | किलो | 55.00 |
| 8 | दोडके - चांगल्या प्रतीचे | 2500.00 | किलो | 47.00 |
| 9 | हिरवा वाटाणा | 3000.00 | किलो | 54.00 |
| जानेवारी- २०२३ ते मार्च २०२३ | | | | |
| 1 | वांगी -चांगल्या प्रतिचा, गावरान | 21250.00 | किलो | 22.00 |
| 2 | टोमॅटो - चांगल्या प्रतिचा, मोठा | 11250.00 | किलो | 22.00 |
| 3 | कोबी - चांगल्या प्रतिचा | 30000.00 | किलो | 14.00 |
| 4 | भोपळा - चांगल्या प्रतिचा | 42500.00 | किलो | 13.00 |
| 5 | पालक - चांगल्या प्रतिचा | 6250.00 | किलो | 19.00 |
| 6 | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | 10000.00 | किलो | 35.00 |
| 7 | आद्रक -चांगल्या प्रतिचा, गावरान | 1000.00 | किलो | 39.00 |
| 8 | दोडके - चांगल्या प्रतीचे | 2500.00 | किलो | 35.00 |

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१०** श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ साजरा करणेस व याकामी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२९१** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ साजरा करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५२,८७,३६८/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.११** श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ किर्तनकार ठरविणे व मानधन निश्चित करणेबाबत.

**निर्णय क्र.२९२** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ मंगळवार दि.१२.०७.२०२२ ते गुरुवार दि.१४.०७.२०२२ या तीन दिवस कालावधीत साजरा करण्यात येणार असल्याने या उत्सव कालावधीत ह.भ.प.सौ.स्नेहल संतोष पित्रे, डोंबीवली यांची किर्तन सेवा घेण्यास व त्याकामी त्यांना रक्कम रु.१५,००१/- मानधन आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१२** श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी कलाकार व मानधन निश्चीत करणेबाबत.

**निर्णय क्र.२९३** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णीमा उत्सव-२०२२ करीता आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी खालील प्रमाणे कलाकार व मानधन निश्चीत करण्यात आले.

| अ. नं. | कलाकाराचे नाव | कार्यक्रमाचा प्रकार | कलाकार संख्या | मानधन | निवास व्यवस्थेसाठी रुम संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री वैष्णवीस नृत्य संस्था, तेलंगणा. | नृत्यनाटीका | ३० | विनामुल्य | १० |
| २ | श्री.अविनाश गांगुर्डे, नाशिक | सारेगामापा लिटल चॅम्पच्या गाण्यांचा कार्यक्रम | २२ | रु.३५,०००/- | ०८ |
| ३ | श्री.अनंत पांचाळ, मुंबई | भजन संध्या | १५ | रु.५०,०००/- | ०५ |

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा महाविद्यालय-प्राध्यापक मुदतवाढ व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्राध्यापक भरती करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्यापीठाने निश्चीत केलेल्या धोरणानुसार शैक्षणिक वर्ष हे सरासरी मे महिन्याचे अखेरीस संपत असते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभुमीवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ संपण्यास जुलै किंवा ऑगस्ट-२०२२ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. महाविद्यालयाकडे सध्या कार्यरत असलेल्या ३० प्राध्यापकांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नेमूण दिलेल्या वर्गांना अध्यापनाचे काम केलेले आहे. सदर प्राध्यापकांचे नियुक्ती आदेशातील अटी शर्तीनुसार त्यांची नेमणूक दि.३१.०५.२०२२ रोजी संपुष्टात येत असुन शैक्षणिक वर्ष संपण्यास जुलै किंवा ऑगस्ट-२०२२ पर्यंतचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात व परिक्षेच्या कालावधीमध्ये त्यांचे जागी नविन प्राध्यापक नेमणे हे विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाचे दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच सध्या कार्यरत असलेल्या तीस प्राध्यापकांपैकी २१ प्राध्यापकांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ संपेपर्यंत विद्यापीठाची मान्यता मिळालेली आहे. यासर्व बाबी विचारात घेता सध्या कार्यरत असलेले ०१ ग्रथंपाल, ०१ शारिरीक शिक्षक संचालक व २८ प्राध्यापक यांना यापुर्वी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (व्दितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच दरम्यानचे कालावधीत मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या विद्यार्थी संख्येनुसार मंजूर शिक्षक पदानुसार प्रशासकीय मान्यतेअंती संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन, विद्यापीठाचे नियमानुसार तज्ञ समितीची नियुक्ती करुन माहे जुलै-२०२२ च्या शेवटच्या आठवडयात किंवा माहे ऑगस्ट महिन्याचे पहिल्या आठवडयात मुलाखती (Walk In Interview) घेऊन, मुलाखतीव्दारे निवड झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात (Ad-hoc) प्राध्यापक भरती करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.१४** **श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरात अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करणेकरीता सदर क्षेत्रातील तज्ञ सल्लागार नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरातील सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली सीसीटीव्ही यंत्रणा कालबाहय झालेली असल्याने श्रींचे समाधी मंदिर व मंदिर परिसरात अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी या क्षेत्रातील तज्ञ तांत्रिक सल्लागार नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४,९८,४००+कर या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेल)**

---

**विषय नं.१५** **संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद पाकिटामध्ये दरपत्रक मागविणे व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये संस्थान मालमत्ता व कामगार विमा पॉलीसी दि.१० जुलै,२०२२ ते दि.०९ जुलै, २०२३ अखेर, रुग्णालये मालमत्ता व कामगार विमा पॉलीस दि.११ जुलै,२०२२ ते दि.१० जुलै, २०२३ अखेर, आणि श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी दि.१२ ऑगस्ट,२०२२ ते दि.१९ ऑगस्ट, २०२३ अखेर, घेणेसाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद पाकिटामध्ये दरपत्रक मागविणे तसेच निम्नतम दरधारक राष्ट्रीयकृत विमा कंपनीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने कार्यादेश देण्यास व याकामी येणा-या एकुण खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.१६** **दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीचे कामासाठी देण्यात येत असलेल्या विशेष मेहनतानाच्या रकमेत वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीचे कामी येणा-या कायम/कंत्राटी कर्मचा-यांना विशेष मेहनताना रक्कम रु.२००/-मात्र दि.०१.०५.२०२२ पासून देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.१७** **माहे जानेवारी-२०२२ व फेब्रुवारी-२०२२ जमा खर्च तक्त्याची नोंद घेणे बाबत.**

**निर्णय क्र.२९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी-२०२२ व फेब्रुवारी-२०२२ या कालावधीतील जमा खर्च तक्त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.१८** **संस्थान परिसरात हर्बल औषधी, वन औषधी, दुर्मिळ वनस्पती यांचे गार्डन तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९९** **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, संस्थान परिसरात हर्बल औषधी, वन औषधी, दुर्मिळ वनस्पती यांचे गार्डन तयार करणे प्रस्तावीत असुन याकामी आयुष मंत्रालय यांचेशी संपर्क करुन सवलतीच्या दरात औषधी वनस्पतीची रोपे मिळणेबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. संस्थानकडे मोठया प्रमाणात पडीक जमिनी आहेत. पडीक जमिनीवर वृक्षारोपन करणे ही मोठया आर्थिक स्वरुपाची व धोरणात्मक बाब नाही. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.१२.२०२१ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१४, ठराव क्र.३५९ अन्वये संस्थान मालकीच्या पडीक व रिकाम्या असणा-या जागेवर गार्डन उभारणी बाबत मा.विश्वस्तांनी सुचना केलेली आहे. तसेच मान्सुनचा कालावधी निघुन गेल्यानंतर याबाबत कार्यवाही करणे शक्य होणार नाही. त्यामुळे याबाबत प्रशासकीय स्तरावर कार्यवाही चालू आहे. वृक्षारोपन करुन उद्यान तयार करणे हे प्रशासकीय स्तरावरील काम असून सदरचा विषय माहितीस्तव सभेमध्ये सादर केलेला आहे. तसेच संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र अभ्यासक्रमासाठी वनस्पती गार्डनची गरज असल्याने ते तयार करण्याची आवश्यकता आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८६ मधील १ हे.२४ आर. क्षेत्रात हर्बल औषधी, वन औषधी, दुर्मिळ वनस्पती यांचे गार्डन तयार करण्यास तसेच याकामी पाण्याची व्यवस्था करणेकामी संस्थानचे पाणीपुरवठा विभागाकडून पाईपलाईन करुन घेणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,५०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१९** **एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) सन २०२२-२३ या वर्षासाठी देणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१६,००,०००/- इतक्या खर्चास तसेच विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.३०० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मंदिर परिसर , साईनगर, श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय+व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, श्री साई प्रसादालय, साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या विविध ठिकाणी कार्यान्वीत असलेल्या एल.ॲन्ड टी. व सिमेन्स कंपनीच्या एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकर्सचे सन २०२२-२३ करीता वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१६,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभाग)

---

विषय नं.२० सन २०२२-२३ करीता दि.०१.०५.२०२२ ते दि.३०.०४.२०२३ या कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.३०१ सन २०२२-२३ करीता दि.०१.०५.२०२२ ते दि.३०.०४.२०२३ या कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदांमध्ये पेपकॉप पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. व ग्लोबल पेस्ट कन्ट्रोल, औरंगाबाद या दोनही निविदाधारकांचे दर जी.एस.टी वगळून प्रति चौ.फुट ०.७८ पैसे समान प्राप्त झालेले आहेत.

पेपकॉप पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी जी.एस.टी वगळून प्रति चौ.फुट ०.६८ पैसे तसेच ग्लोबल पेस्ट कन्ट्रोल, औरंगाबाद यांनी जी.एस.टी वगळून प्रति चौ.फुट ०.७६ पैसे हे अंतिम दर लेखी स्वरुपात दिलेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२२-२३ करीता दि.०१.०५.२०२२ ते दि.३०.०४.२०२३ या कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी निम्नतम दरधारक पेपकॉप पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी देऊ केलेले जी.एस.टी वगळून प्रति चौ.फुट ०.६८ पैसे हे अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

विषय नं.२१ श्रींचे पुरातन वस्तुंचे जतन करणेकामी छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई येथील तज्ञांचे शिर्डी येथे दि.०४ ते ०६/०२/२०२२ रोजीचे दौ-याबाबत अहवाल.

निर्णय क्र.३०२ श्रींनी हाताळलेल्या वस्तुंवर तज्ञांमार्फत संवर्धन प्रक्रिया करणे संदर्भात मा.डॉ.एस मुखर्जी, जनरल डायरेक्टर, छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई व त्यांचे समवेत तांत्रिक सल्लागार हे दि.०४.०२.२०२२ ते दि.०६.०२.२०२२ अखेर शिर्डी येथे पाहणीकरीता आले होते. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार श्रींचे समाधी मंदिर शोरुममधील श्रींच्या पादुका व सटका, व्दारकामाईची शिळा तसेच म्युझियम हॉल येथील फोटोंवर संवर्धनाचे काम करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांनी हाताळलेल्या विविध पुरातण वस्तुंचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई येथील तज्ञांकडून संवर्धनाचे काम करुन घेणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच श्रींचे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, दिक्षीतवाडा या पुरातण वास्तुंचे संवर्धनाचे काम करुन घेण्यात यावे, असे ठरले. याकामी पुरातत्व विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा, अशी सुचना करण्यात आली.

(कार्यवाही- मंदिर विभाग)

---

विषय नं.२२ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात लाडू प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात आलेल्या हरबरा डाळ व हिरवी विलायची इ.किराणा मालाच्या घट तुटीबाबत.

निर्णय क्र.३०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात लाडू प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात आलेल्या हरबरा डाळ व हिरवी विलायची इत्यादी किराणा मालाच्या घट-तुट अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

विषय नं.२३ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा अवलोकनार्थ अहवाल.

निर्णय क्र.३०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुट अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

विषय नं.२४ श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ अखेर खाद्यतेल, वनस्पती तुप, शुध्द तुप व काजूचे रिकाम्या डब्यांचा अहवाल.

निर्णय क्र.३०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ अखेर खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात आलेल्या खाद्यतेल, वनस्पती तुप, शुध्द तुप व काजूचे रिकामे डबे यांची अभिलेख कक्षामार्फत करण्यात आलेली विक्री व दैनंदिन वापरासाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांचे अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमधील नव्याने संगणकीकरण करणेकामी नविन संगणके, यु.पी.एस. व प्रिंटर्स साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये उपचार घेणेकामी येत असलेल्या रुग्णांची संख्या वाढत आहे. विभागाचे दैनंदिन कामकाज करणेकामी सध्या कार्यान्वीत असलेले संगणके व संगणकीय साहित्य अपुरे पडत आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात वेळोवेळी अडचणी निर्माण होत असून उपचार घेणेकामी आलेल्या रुग्णांना तातडीची सेवा देण्यास विलंब होत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमधील नव्याने संगणकीकरण करणेकामी नविन संगणके, यु.पी.एस. व प्रिंटर्स साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,५६,५६,२१३/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्टिपल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्ता, व्यवसाय रोध भत्ता व सानुग्रह अनुदान यात सुधारणा करणेबाबत.

निर्णय क्र.३०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय उपसमिती सभेमध्ये ठेवण्यात यावा, असे ठरले.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०३ श्री साईबाबा संस्थानच्या कार्यरत असलेल्या कायम/मानधन/कंत्राटी (इनसोर्स/आऊटसोर्स) कर्मचा-यांच्या कोविड आजाराने मयत झालेणे संस्थानकडून सानुग्रह अनुदान देणेबाबत.

निर्णय क्र.३०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **देणगी व जनसंपर्क कार्यालय येथे २३ नग संगणके खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगी कार्यालय व जनसंपर्क विभाग या दोन्ही विभागातील संगणक प्रणालीबाबत वारंवार येणा-या अडचणीचे निरसण होणेकामी २३ संगणके तातडीने बदलणे आवश्यक असल्याने २३ नग संगणके खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s Racca Infotech Pvt Ltd.Nashik यांचे निम्नतम दर प्रति नग रक्कम रु.६२,४००+कर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **इंधन खर्चात कपात होणेकामी संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी कमर्शिअल ऐवजी डोमेस्टीक गॅस सिलेंडरचा वापर सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१०** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत श्री साईभक्तांना चहा, कॉफी, दुध इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी १९ किलो क्षमतेचे व्यावसायीक एल.पी.जी.गॅस सिलेंडरचा वापर करण्यात येत आहे. याकामी अंदाजे वार्षिक रुपये ६२ लाख रुपये खर्च येतो. तथापी सदरचे गॅस सिलेंडर हे संस्थान व्यवसाय करण्यासाठी वापरत नसल्याने याकामी Domestic Rate ने सिलेंडर मिळाल्यास संस्थानची अंदाजे रुपये २४ लाख वार्षिक बचत होणार आहे. त्याकरीता IOCL, BPCL व HPCL या भारत सरकारच्या अंगीकृत पेट्रोलियम कंपन्यांना केंद्र शासनाच्या दि.०५.०२.२०१३ रोजीचे पत्राचा संदर्भ देऊन संस्थानला Commercial Rate ऐवजी Domestic Rate ने सिलेंडर (रिफीलींग) पुरवठा करणेबाबत पत्रान्वये कळविणेत आले होते. सदर पत्रास अनुसरुन IOCL व HPCL या कंपन्यांनी संस्थानला Domestic Rate ने सिलेंडर पुरविणेबाबत लेखी पत्राव्दारे संमती दिलेली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी समृध्दी इंण्डेन, राहाता यांचेकडून IOCL व श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांचेकडून HPCL या कंपन्यांचे Domestic एल.पी.जी. गॅस सिलेंडर दि.०१.०६.२०२२ पासुन दरमहा खरेदी (रिफीलींग) करण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच कॅन्टीन विभागासाठी १९ किलो क्षमतेचे व्यावसायिक गॅस सिलेंडर (रिफीलींग) खरेदी करणेबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०४.२०२२ रोजीचे सभेमधील निर्णय क्र.२५० निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर विषयावर चर्चा सुरु असतांना असे निदर्शनास आले की, संस्थानला Domestic Rate ने गॅस सिलेंडर मिळणे शक्य होते. तथापी याबाबत कोणत्याही प्रकारचे प्रयत्न संबधीतांकडून करण्यात आलेले नाही. याबाबत संबधीतावर जबाबदारी निश्चीत करण्यात यावी.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग/सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईंचे दर्शनासाठी येणा-या भक्तांना ०४ नग मोतीचुर लाडू प्रसाद आकर्षक बॉक्स पॅकींगमध्ये तसेच ०१ नग मोतीचुर लाडू प्रसाद रंगीत कागदी पिशवी पॅकींगमध्ये उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३११** **श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना ०४ नग मोतीचुर लाडू प्रसादाचे (अंदाजे एकूण वजन २०० ग्रॅम) स्वतंत्र अशा आकर्षक रंगीत पुठ्ठा बॉक्समध्ये पॅकिंग करुन तसेच ०१ नग मोतीचुर लाडूप्रसादाचे (अंदाजे वजन ५० ग्रॅम) रंगीत कागदी पिशवीमध्ये स्वतंत्र पॅकिंग करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्याचा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस सांगीतले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना ०४ नग मोतीचुर लाडू प्रसादाचे (अंदाजे एकूण वजन २०० ग्रॅम) स्वतंत्र अशा आकर्षक रंगीत पुठ्ठा बॉक्समध्ये पॅकिंग करुन उपलब्ध करुन देणेसाठी तूर्त प्रायोगीक तत्वावर ५००० नग बॉक्सेस उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेल्या**

वर्णनाप्रमाणे (Specification) किंवा बाजारात उपलब्ध असणारे बॉक्स पॅकिंग कंपन्यांकडून प्राप्त होणारे विविध दर्जाच्या नमुन्यामधुन उचित नमुना निवडून, त्याप्रमाणे बॉक्सेस खरेदी करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

या उपक्रमास साईभक्तांचा चांगला प्रतिसाद लाभल्यास विक्री होणा-या एकुण लाडूप्रसाद विक्रीचे २० टक्के इतकी पॅकींग बॉक्सेसमध्ये करुन ती साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यास व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सध्या असणारे ०३ नग मोतीचुर लाडू प्रसादाचे पॅकिंग आहे तसेच ठेऊन ०१ नग मोतीचुर लाडूप्रसादाचे रंगीत कागदी पिशवीमध्ये स्वतंत्र पॅकिंग करुन, ०१ नग मोतीचुर लाडूप्रसादाचे (अंदाजे वजन ५० ग्रॅम) पाकिट रुपये १०/-मात्र प्रति पाकिट या दराने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ सन २०२१-२२ मध्ये (माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२) दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटप करणेत आलेल्या लाडूप्रसाद पाकीटांसाठी (५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट) आलेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.३१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१-२२ मध्ये (माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२) दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटप करणेत आलेल्या लाडूप्रसाद पाकीटांसाठी (५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट) आलेल्या खर्चाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ प्रशिक्षणार्थी पुजारी घेणेबाबत.

निर्णय क्र.३१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागास पुजारी पदाचे काम करणा-या कर्मचा-यांची तातडीने आवश्यकता असल्याने ८ पुजारी नियुक्ती कामी जाहिरातीव्दारे अर्ज मागविणेस तसेच अर्ज करणा-या उमेदवारांमधुन संस्थानचे रुढी व परंपरेनुसार चालत असलेल्या पुजा विधी पध्दतीनुसार निवड होणा-या उमेदवारांना विशेष प्रशिक्षण देऊन सदर उमेदवारांची प्रशिक्षणार्थी पुजारी म्हणून कॉन्ट्रक्ट बेसीसवर अथवा मानधन तत्वावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, सेवा निलंबीत प्र.प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, श्री.विनोद गोवर्धन कोते, प्र.सी.सी.टी.व्ही.विभाग प्रमुख, श्री. चेतक चांगदेव साबळे, सेवा निलंबीत मदतनीस,सी.सी.टी.व्ही.विभाग, श्री.म.दी.धनेश्वर, सेवानिवृत्त क.कामगार अधिकारी यांचे दि.१३.०४.२०२२ रोजीचे अपिल अर्जाबाबत.

निर्णय क्र.३१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, सेवा निलंबीत प्र. प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, श्री.विनोद गोवर्धन कोते, प्र.सी.सी.टी.व्ही.विभाग प्रमुख, श्री.चेतक चांगदेव साबळे, सेवा निलंबीत मदतनीस, सी.सी.टी.व्ही.विभाग, यांचे दि. १३.४.२०२२ रोजीचे अपिल अर्जातील उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले १ ते १० मुद्दे फेटाळण्यात आले.

श्री.जगताप, श्री.कोते व श्री.साबळे यांनी दि.१३.०४.२०२२ रोजी केलेल्या अपिल अर्जामध्ये चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी बदलणेबाबत तसेच श्री.म.दि.धनेश्वर यांना बचाव सहायक म्हणून काम करणेस मान्यता मिळावी अशी मागणी केली आहे.

अर्जदार यांची सादरकर्ता अधिकारी बदलण्याची मागणी अमान्य करण्यात आली.

श्री.म.दि. धनेश्वर (सेवानिवृत्त संस्थान कर्मचारी) हे संस्थानमध्ये क.कामगार अधिकारी या पदावर कार्यरत असतांना ११ वर्ष बडतर्फ (डीसमिस) होते. महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार अशा व्यक्तींना बचाव सहायक म्हणून काम करता येत नाही. त्यामुळे श्री.म.दि.धनेश्वर यांची बचाव सहायक म्हणून काम करणेस मान्यता मिळणेची मागणी अमान्य करण्यात आली.

विभागीय खाते चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी बदलणे बाबतची मागणी मान्य करण्यात आली.

तसेच विभागीय खाते चौकशी सहा महिन्याचे आत पुर्ण करण्यात यावी. संबधीत कर्मचा-यांना विभागीय खाते चौकशीस सहकार्य न केल्यास एकतर्फी निर्णय घेण्यात येईल, याबाबत सुचित करण्यात यावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१० श्री.विठ्ठल तुकाराम पवार, मदतनीस, आरोग्य विभाग यांचे दि.१६.०३.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.३१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, गैरशिस्त वर्तनाबाबत कार्यवाही सुरु असलेल्या सर्व कर्मचा-यांचे विषयावर निर्णय घेणेकामी मा.ॲड.जगदीश सावंत, उपाध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली दि.१३.०६.२०२२ रोजी उपसमितीची सभा आयोजित करण्यात यावी. व या उपसमितीसभेमध्ये सदर विषयाचा समावेश करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.११ संस्थानचे कर्मचा-यांसाठी लागू असलेले संस्थानचे सेवाविनियम-२०१३ मधील प्रकरण ३ कलम ५ व श्री साईबाबा संस्थान अधिनियम-२००४ मधील कलम १४ मध्ये (ख) पोटकलम (२) मधील (तीन) दुरुस्तीकरणेकरीता शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३१६ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

मा.विश्वस्तांनी आयत्या वेळी घेतलेले ठराव

आयत्या वेळेचा विषय नं.१२
ठराव क्र.३१७ संस्थान मालकीचे विविध ठिकाणचे जागा/गाळे श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना विविध प्रकारच्या व्यवसायासाठी भाडेतत्वावर वापरास देण्यात आलेले आहे. एकुण किती ठिकाणचे जागा/गाळे वापरास देण्यात आलेले आहेत. तसेच ज्या व्यवसायासाठी देण्यात आलेले आहेत त्यासाठीच सदर जागा/गाळे यांचा वापर होत आहे काय? याबाबत खातरजमा करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१३
ठराव क्र.३१८ साईआश्रम भक्तनिवास येथील प्रसाद लाडू विक्री काऊंटर सकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्रौ. १० या दोन शिफ्टमध्ये सुरु करण्यात यावे.

(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१४

ठराव क्र.३१९ श्री साईबाबा दैनंदिनी-२०२३ दिपावलीमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल या प्रमाणे नियोजन करण्यात यावे. श्री साईबाबा दैनंदिनी-२०२३ छपाई करणेबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा. (कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१५

ठराव क्र.३२० संस्थानचे विविध विभागाकडील शासन मान्यतेसाठी प्रलंबीत असलेल्या प्रस्तावांची माहिती सर्व मा.समिती सदस्यांना देण्यात यावी. (कार्यवाही-सर्व विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१६

ठराव क्र.३२१ श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्षामध्ये सुरु करण्यात आलेला श्रींच्या पादुका दर्शन सोहळा पुन्हा सुरु करणेबाबत नियोजन करण्यात यावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, एखाद्या विशिष्ठ प्रसंगी अथवा महोत्सवासाठी श्रींच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेबाबत प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येईल.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/मंदिर विभाग/जनसंपर्क विभाग/संरक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१७

ठराव क्र.३२२ लाडू प्रसाद तयार करणेकामी १ क्विंटल साखरेच्या प्रमाणात तीन किलो काजु वापरण्यात यावे. प्रसाद लाडूचा दर्जा सुधारणेकामी आवश्यक असणारे काजु, विलायची व मनुके खरेदी करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय स्तरावर तातडीने कार्यवाही करुन, याकामी येणा-या खर्चाचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१८

ठराव क्र.३२३ राज्य शासनाच्या प्लास्टीक बंदी धोरणाची अंमलबजावणी संस्थानमध्ये करण्यात यावी.

(कार्यवाही-सर्व विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१९

ठराव क्र.३२४ दर गुरुवारी मंदिरातुन निघणा-या पालखी सोहळयाचे वेळी होणा-या विधींपैकी जे विधी प्रथा-परंपरेनुसार नाहीत असे विधी पालखी सोहळयाकरीता उपस्थित असलेले मा.समिती सदस्य यांनी करण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्यांचे हस्ते करण्यात यावे. (कार्यवाही-मंदिर विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२०

ठराव क्र.३२५ श्रींचे मंदिरामध्ये प्रवेश करतेवेळी फुल, हार, गुच्छ, नारळ, प्रसाद नेण्यात येऊ नयेत, याबाबतचे फलक दर्शनी भागात लावण्यात यावेत. (कार्यवाही-बांधकाम विभाग/मंदिर विभाग/संरक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२१

ठराव क्र.३२६ संस्थानचे सर्व ठिकाणी वापरातील विजेचे एनर्जी ऑडीट करुन वीज बचतीबाबत उपाययोजना करणेत याव्यात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.२२

ठराव क्र.३२७ संस्थानकडे जमा होणा-या देणगी रकमेचा व गुंतवणूकीचा अहवाल सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२३**

**ठराव क्र.३२८** **संस्थानच्या सर्व भक्तनिवास मधील गादी, उशी, बेडशिट, उशीकव्हर, चादरी सद्यस्थितीचा आढावा घेऊन गरज असल्यास नव्याने खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.**

**(कार्यवाही-सर्व भक्तनिवासस्थान)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२४**

**ठराव क्र.३२९** **संस्थानचे रुग्णालयातील X-Ray चे दर अत्यल्प असल्याने X-Ray काढणेसाठी बाहेरील रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात असते. त्यामुळे संस्थानचे रुग्णालयातील रुग्णांना सेवा देण्यास विलंब होतो. याकरीता बाहेरील रुग्णांचे प्रमाण नियंत्रीत ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२५**

**ठराव क्र.३३०** **साईभक्तांना प्रसाद लाडू हा एकाच प्रकारातील प्रसाद उपलब्ध करुन देण्यात येतो. त्याचबरोबर वेगवेगळया प्रकारातील प्रसाद भक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत पडताळणी करण्यात यावी.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, प्रसाद लाडू प्रमाणेच वेगवेगळया स्वरुपात प्रसाद तयार करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.** **(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२६**

**ठराव क्र.३३१** **देणगीदार साईभक्त तसेच मान्यवर यांचे सत्काराचे वेळी साईबाबांचा फोटो देण्यात यावा, याकामी फोटो निश्चीत करण्यात यावा.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी साईबाबांचा फोटो देणेबाबतची कार्यवाही प्रशासकीय स्तरावर सुरु करण्यात आलेली असुन याबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात येईल.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग/जनसंपर्क विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२७**

**ठराव क्र.३३२** **श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन घेणेकामी वापरण्यात येणारी ताटे स्वच्छ व व्यवस्थित धुतलेली असावी. तसेच प्रसाद भोजन घेणेकरीता येणा-या साईभक्तांना हात धुण्यासाठी लिक्वीड सोप या सारख्या सोई सुविधा उपलब्ध करुन देणकामी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.** **(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२८**

**ठराव क्र.३३३** **श्री साई प्रसादालय येथील व्ही.आय.पी. हॉलचे नुतनीकरण करुन घेण्यात यावे.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय/बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.२९**

**ठराव क्र.३३४** **श्री साईबाबा महाविद्यालय करीता प्राचार्य पद भरणेकामी स्वतंत्र प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३०**

**ठराव क्र.३३५** **संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय या विभागातील विषयांबाबत समिती सदस्य मा.श्री.जयवंतराव जाधव यांचे अध्यक्षतेखाली दि.२९.०५.२०२२ रोजी उपसमितीची सभा आयोजित करण्यात यावी. संस्थानचे शैक्षणिक संकुलाचे विषयांबाबत समिती सदस्य मा.श्री. सुरेश वाबळे यांचे अध्यक्षतेखाली दि.३०.०५.२०२२ रोजी उपसमितीची सभा आयोजित करण्यात यावी.**

तसेच संस्थान कर्मचा-यांचे गैरशिस्त वर्तनाचे विषयांबाबत उपाध्यक्ष मा.ॲड.जगदीश सावंत यांचे अध्यक्षतेखाली दि.१३.०६.२०२२ रोजी उपसमितीची सभा आयोजित करण्यात यावी.

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३१**

**ठराव क्र.३३६** कै.संताजी भिवसेन शेळके तसेच कै.दगडूभाऊ गायके पाटील यांचे फोटो समाधी मंदिराचे सभामंडपात लावणेबाबत चर्चा करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, या संदर्भात फोटो लावणेकामी जागा उपलब्धतेबाबत माहिती घेऊन कै.संताजी भिवसेन शेळके तसेच कै.दगडूभाऊ गायके पाटील यांचे फोटो समाधी मंदिराचे सभामंडपात लावणेबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०१.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४८ 'श्रींचे समकालीन संत व साईभक्तांचे फोटो लावणे करीता सुसज्ज आर्ट गॅलरी तयार करण्यात यावी.' असा निर्णय झालेला आहे.

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३२**

**ठराव क्र.३३७** श्री साईनाथ रुग्णालयातील दुस-या मजल्यावर असलेली नेत्र विभाग ओपीडी तळमजल्यावर सुरु करण्यात यावी. **(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३३**

**ठराव क्र.३३८** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०३.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६७ अन्वये दि.३०.०४.२०२२ पर्यंत मागील मंजूर दराने शुध्द तुप खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे. तथापी शुध्द तुपाचा बाजारभाव व पुरवठादाराने आकारलेली रक्कम यात खुप तफावत असल्याने शुध्द तुप खरेदी करतांना निविदेमधील अटीशर्तीमध्ये बदल करावा असे निर्देश मा.अध्यक्ष महोदय व मा.सदस्यांनी दिलेले आहेत. त्यानुसार निविदेतील अटी शर्तीमध्ये बदल करुन नवीन अटी शर्ती निविदेत अंतर्भुत केल्या आहेत. वरील प्रक्रियेमुळे निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी अजुन काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे आहे त्याच दराने मागील पुरवठादार यांचेकडून किंवा तातडीचे परिस्थितीत दरपत्रके मागवुन खुल्या बाजारामधुन किरकोळ दराने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देई पर्यंत सदर तुप खरेदीस मान्यता देण्यात आली.

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

**आयत्या वेळेचा विषय नं.३४**

**ठराव क्र.३३९** साईभक्तांना प्रसादालयाकडे जाणेसाठी असणा-या बसेसची संख्या वाढविण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, याबाबत संस्थानकडे उपलब्ध असलेल्या बसेसची संख्या बघुन आवश्यकता भासल्यास नवीन बस खरेदी करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.३५**

**ठराव क्र.३४०** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव सन-२०२२ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.कैलास मंडप ॲन्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांनी सदरचे काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने याकामी तात्काळ कमी कालावधीची ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व मुंबई ते शिर्डी मार्गावरील पालखी पदयात्रीचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था इच्छुक देणगीदार साईभक्तांमार्फत देणगी दाखल करुन घेण्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०३.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार मुंबई ते शिर्डी मार्गावरील पालखी पदयात्रीचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक कामे साईकृपा टेन्ट हाऊस,बेलापुर यांचेकडून करुन घेण्यात आलेली आहे. तथापी याकामी देणगीदार

उपलब्ध न झाल्याने सदर कामाची रक्कम रु.६,९७,७६७/-मात्र ठेकेदार साईकृपा टेन्ट हाऊस,बेलापुर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.३६

ठराव क्र.३४१ जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळा खोल्यांचे बांधकाम करणेसाठी संस्थानकडून रक्कम रुपये दहा कोटी आर्थिक अनुदान देण्यात आलेले आहे. तथापी सदर शाळा खोल्यांचे बांधकाम शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्यात यावे. अशी अट संस्थानकडून घालण्यात आलेली आहे. जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी शाळा खोल्यांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी जिल्हा परिषदेमार्फत करण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केलेली असुन त्यांची विनंती मान्य करण्यात आली. (कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा विषय नं.३७

ठराव क्र.३४२ संस्थान कर्मचा-यांचे आगमन-निर्गमनासाठी असलेली थम पचिंग प्रणाली पुर्ववत सुरु करण्यात यावी. तसेच फेस रिडींग चालू करणेकामी कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही- माहिती व तंत्रज्ञान विभाग/सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.३८

ठराव क्र.३४३ संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉ.बिडगर, आर्थोपिडीक सर्जन यांचेवरील कारवाई बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.३९

ठराव क्र.३४४ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम आदा करणेबाबतचे प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करतेवेळी सदर प्रस्तावामध्ये आजाराचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.४०

ठराव क्र.३४५ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, संस्थानचे पडीक जमीनीची पाहणी करुन त्यावर पावसाळयाचे सुरुवातीस वृक्षारोपन करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग/बगीचा विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं.४१

ठराव क्र.३४६ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, संस्थानचे रुग्णालयांमध्ये Trauma Care Unit, AYUSH Department तसेच Paramedical Courses, P.G. and DNB & CPS Courses सुरु करणेकामी मार्गदर्शन मिळणेबाबत तसेच संस्थान रुग्णालयांना भेट देऊन सदरचे उपक्रम सुरु करणेसाठी आवश्यक असणा-या सोयी-सुविधा संस्थानचे रुग्णालयामध्ये वाढविणेकामी मार्गदर्शन मिळावे याकरीता संचालक, ऑल इंडीया इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस, नवी दिल्ली यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच Thalassemia Centre सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. व हे रुग्णसेवेसाठी असून यात आपले रुग्णालयातील रुग्णसंख्येची क्षमता व रुग्णालयाचा दर्जा वाढविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच सदर विषय माहितीस्तव सभेपुढे सादर केलेला आहे.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा विषय नं.४२

ठराव क्र.३४७ संस्थानचे दोन्हीही रुग्णालय संगणकीकृत करणेकामी मुंबई सारख्या मोठया शहारातील रुग्णालयांचे software व संगणकीकृत कामकाजाची माहिती घेणेकामी मा.ॲड.जगदीश सावंत, उपाध्यक्ष,

**मा.श्री.रराहूल कनाल, सदस्य व मा.श्री.जयवंतराव जाधव, सदस्य यांची नावे निश्चीत करण्यात आली. तसेच वेळेवर जे मा.सदस्य उपलब्ध होतील त्यांचाही समावेश करण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.४३**

**ठराव क्र.३४८** **साईभक्तांचे सोई-सुविधेकरीता विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या पालखी थांब्यांचे नुतनीकरण करुन ११ महिन्याचे कालावधीकरीता अटी/शर्तीनुसार वापरास देणेकामी जाहिरात देण्यात यावी. पालखी थांब्यांचे नुतनीकरण करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग/मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.४४**

**ठराव क्र.३४९** **साईभक्तांना दर्शनासाठी जनसंपर्क कार्यालयाकडून पास व टोकण नंबर देण्याची व्यवस्था पुर्वीप्रमाणे सुरु करण्यात यावी.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग/मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.४५**

**ठराव क्र.३५०** **ज्या कर्मचा-यांना ५ वेळा सक्त ताकीद व १ वेतनवाढ रोखण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे. अशा कर्मचा-यांचे विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावे.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.४६**

**ठराव क्र.३५१** **संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीमध्ये म्युझियम सुरु करणेबाबत पडताळणी करण्यात यावी.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा विषय नं.४७**

**ठराव क्र.३५२** **शिर्डी पोलीस स्टेशन,शिर्डी गु.र.नं.३१०/२०२१ अन्वये गुन्हामध्ये अटक झालेल्या संस्थान कर्मचा-यांपैकी आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी राहूल मारुती फुंदे व सचिन लक्ष्मण गव्हाणे यांचे विरुध्द एफआरआय दाखल झालेला नाही. त्यामुळे सदर कर्मचा-यांना पुर्ववत आऊटसोर्स पध्दतीने ठेकेदारामार्फत कामावर घेणेबाबत नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी सुचना करण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**वरील निर्णय/ठराव क्र.२८२ ते ३५२ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.) | (ना.आशुतोष अशोकराव काळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**